# ‘प्रसिध्दी पत्रक’
# पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद

**शुक्रवार, दि.२०/०९/२०१९**

## “ काठीने मारहान करुन वृध्दाचा खुन.”

**<u>पोलीस ठाणे, उस्मानाबाद (ग्रामीण):</u>** सहदेव पंढरी कठारे वय ६० वर्षे रा.सारोळा (बु), ता. जि.उस्मानाबाद हे दि. १९.०९.२०१९ रोजी १३.०० वा.सु. मद्य पिण्यासाठी त्यांच्याच गावातील गोपाळ भगवान कुंभार यांच्या घरी गेले असता त्यांनी “तु दारु पिण्यास का आलास” या कारणावरुन तर रामकृष्ण उर्फ बिभीषण लक्ष्मण आगाशे व पारुबाई रामकृष्ण उर्फ बिभिषण आगाशे या पती-पत्नीने पैशाच्या कारणावरुन सहदेव पंढरी कठारे काठीने मारहान करुन ठार मारले. अशा मजकुराच्या मयताचा मुलगा दशरथ सहदेव कठारे रा. सारोळा (बु) , ता. उस्मानाबाद यांच्या फिर्यादीवरुन वरील तिन्ही आरोपींविरुध्द पोलीस ठाणे, उस्मानाबाद (ग्रामीण) येथे भा.दं.वि. कलम ३०२, ३४ सह अ.जा.ज.अ.प्र. कायदा कलम ४ (१), १ (एस) प्रमाणे गुन्हा दि. १९.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

## “मुरुम: अल्पवयीन मुलीचा विनयभंग.”

**<u>पोलीस ठाणे, मुरुम:</u>** श्रावण नामदेव गायकवाड रा. मुरुम, ता.उमरगा याने दि. १९.०९.२०१९ रोजी १५.०० वा.सु. खाऊ देण्याच्या बहाण्याने अल्पवयीन मुलीचा विनयभंग केला. अशा मजकुराच्या पिडीत अल्पवयीन मुलीच्या आईच्या फिर्यादीवरुन त्याच्याविरुध्द पोलीस ठाणे, मुरुम येथे भा.दं.वि. कलम ३५४, ३५४ (ब), सह पोक्सो कायदा कलम १२ प्रमाणे गुन्हा दि. १९.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

## “पैशांसाठी विवाहीतेचा सासरकडुन छळ: ३ गुन्हे दाखल.”

**<u>पोलीस ठाणे, येरमाळा:</u>** १) मंगेश भजनदास गुरव (पती) २) नितीन भजनदास गुरव (दिर) ३) अशोक भजनदास गुरव (दिर) ४) स्वाती नितीन गुरव (जाव) सर्व रा. शिराळा, ता.परंडा यांनी आपापसात संगणमत करुन दि. २५.१२.२०१९ रोजी ०८.०० पासुन ते आज पर्यंत बार्शी व भुम येथे विवाहितेस अपशब्द बोलून शारीरिक व मानसिक त्रास दिला. तसेच “वडीलांकडुन ५०,०००/-रु. किंवा मोटारसायकल घेउन ये तरच तुला नांदवितो.” असा तगादा लावुन विवाहितेस व तिच्या आई-वडीलांना जिवे ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या पिडीत विवाहितेच्या फिर्यादीवरुन वरील आरोपींविरुध्द पोलीस ठाणे, येरमाळा येथे भा.दं.वि. कलम ४९८ (अ), ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दि. १९.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

**<u>पोलीस ठाणे, परंडा:</u>** १) हारुन इक्बाल शेख (पती) २) इक्बाल नुरमंहमद शेख (सासरे) ३) शायरा इक्बाल शेख (सासु) ४) अत्तर इक्बाल शेख (दिर) ५) जुबेदा शेहनवाज शेख (ननंद) सर्व रा. हडपसर जुना माढा संगम सोसायटी प्लॉट नं. ४ पुणे ६) मावस सासु (पुर्ण नांव माहित नाही) रा. तोफखाना पुणे यांनी दि. ०७.०५.२०१७ पासुन ते दि. ०५.०८.२०१९ रोजी ११.०० वा. पर्यंत सासरी व परंडा येथे अनेकदा किरकोळ कारणावरुन सुनेस शिवीगाळ व मारहान करुन त्रास दिला. तसेच माहेरहुन पैसे घेवुन ये म्हणुन सुनेचे डोके भिंतीवर आदळुन तिला जखमी केले. अशा मजकुराच्या पिडीत सुनेने वैद्यकिय उपचारादरम्यान दिलेल्या जबाबावरुन (एम.एल.सी) वरील आरोपींविरुध्द पोलीस ठाणे, परंडा येथे भा.दं.वि. कलम ४९८ (अ), ३२४, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दि. १९.०९.२०१९ रोजी दाखल करण्यात आला आहे.

**पोलीस ठाणे, उमरगा:** १) अमोल सुखदेव सरगर (पती) २) सुखदेव आबा सरगर (सासरे) ३) ताराबाई सुखदेव सरगर (सासु) सर्व रा. नाझरा, ता.सांगोला, जि. सोलापूर ४) कासाबाई रावसाहेब अलदर (ननंद) ५) रावसाहेब अलदर (नंदावा) दोघे रा. कोळा, ता.सांगोला, जि.सोलापुर यांनी आपापसात संगणमत करुन जानेवारी २०१७ ते दि. ०५.१०.२०१८ दरम्यान त्यांच्या सुनेस तिच्या सासरी व तिच्या माहेरी जवळगा (बेट), ता.उमरगा येथे मान-सन्मानाच्या कारणावरुन तिला शिवीगाळ करुन मारहान केली. तसेच माहेरहुन ५०,०००/-रु. घेवुन ये म्हणुन शारीरिक व मानसीक त्रास देउन तिचा छळ केला. अशा मजकुराच्या सुनेच्या फिर्यादीवरुन वरील आरोपींविरुध्द पोलीस ठाणे, उमरगा येथे भा.दं.वि. कलम ४९८ (अ), ३२३, ५०४, ३४ प्रमाणे गुन्हा दि. २०.०९.२०१९ रोजी दाखल करण्यात आला आहे.

**“मौजे व्होर्टी: सांडपाणी सोडल्याच्या कारणावरुन पती-पत्नीस मारहान.”**

**पोलीस ठाणे, नळदुर्ग:**. मनोहर लिंबाजी सगर, रा. व्होर्टी, ता.तुळजापूर यांनी सांडपाणी घरासमोरील नालीत सोडल्याच्या कारणावरुन त्यांच्याच गावातील १) महादेव शिवाजी सगर २) व्यंकट नरसु सगर ३) विष्णु शिवाजी सगर ४) मनोरमा व्यंकट सगर यांनी संगणमत करुन दि. १७.०९.२०१९ रोजी ११.०० वा.सु मनोहर सगर व त्यांच्या पत्नीस शिवीगाळ करुन, खुनाची धमकी देउन लोंखडी पट्टीने मारहान करुन जखमी केले. अशा मजकुराच्या मनोहर लिंबाजी सगर यांनी वैद्यकिय उपचारादरम्यान दिलेल्या जबाबावरुन (एम.एल.सी.) वरील आरोपींविरुध्द पोलीस ठाणे, नळदुर्ग येथे भा.दं.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दि. १९.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

**“उस्मानाबाद: घरातील किराणा सामान व रोख रकमेची चोरी.”**

**पोलीस ठाणे, उस्मानाबाद (शहर) :** विलास नवनाथ राठोड रा. जाधववाडी रोड, हनुमान चौक, उस्मानाबाद यांच्या घराच्या कुलपाचा कोंडा दि. १८.०९.२०१९ रोजी २१.०० ते दि. १९.०९.२०१९ रोजी ०५.३० वा. दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरट्याने तोडुन घरातील ३,०००/-रु. किंमतीचे किराणा सामान व रोख रक्कम ५०,०००/-रु. असा एकुण ५३,०००/-रु. चा माल चोरुन नेला आहे. अशा मजकुराच्या विलास नवनाथ राठोड यांच्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द पोलीस ठाणे, उस्मानाबाद (शहर) येथे भा.दं.वि. कलम ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दि. १९.०९.२०१९ रोजी दाखल करण्यात आला आहे.

**“उस्मानाबाद: सोन्याचे दागिने व रोख रकमेची चोरी.”**

**पोलीस ठाणे, आनंदनगर :** सुनिता अर्जुन मस्के रा. शिंगोली रेस्ट हाऊस जवळ, उस्मानाबाद यांच्या घराच्या दरवाजाचे कुलूप दि. ०९.०९.२०१९ रोजी ११.०० ते दि. २०.०९.२०१९ रोजी पहाटे ०५.०० वा.चे दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरट्याने तोडुन लोखंडी पेटीतील १५ ग्रॅम सोन्याचे दागिने किं.अं. ३७,५००/-रु. व रोख रक्कम १५,०००/-रु. असा एकुण ५२,५००/-रु. चा माल चोरुन नेला आहे. अशा मजकुराच्या सुनिता मस्के यांच्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द पोलीस ठाणे, आनंदनगर येथे भा.दं.वि. कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दि. २०.०९.२०१९ रोजी दाखल करण्यात आला आहे.

**“उमरगा: मोटारसायकलच्या डिकीतुन रक्कम चोरीस.”**

**पोलीस ठाणे, उमरगा :** युवराज श्रीकांत तंशेट्टी, अल्पबचत प्रतिनीधी, रा. बेळंब, ता.उमरगा यांनी दि. २०.०९.२०१९ रोजी १४.२८ वा.सु. त्यांची मोटारसायकल सकाळ वृत्तपत्र कार्यालयासमोर, उमरगा येथे लावली असता कोणीतरी अज्ञात चोरटयांनी त्यांच्या मोटारसायकलच्या डिकीमधे ठेवलेले ६५,०००/-रु. चोरुन नेले आहेत. अशा मजकुराच्या युवराज तंगशेट्टी यांच्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द पोलीस ठाणे, उमरगा येथे भा.दं.वि. कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दि. २०.०९.२०१९ रोजी दाखल करण्यात आला आहे.

**"दुधाचा टँकर आडवुन चालक-वाहकास लुटले."**

**<u>पोलीस ठाणे, परंडा :</u>** ट्रक चालक शिवाजी सुभाष खोमणे रा. शेळगाव, ता.इंदापूर, जि.पुणे हे दि. १९.०९.२०१९ रोजी सागर अनिल कुंभार यांना सोबत घेवुन दुध टँकर क्र. एम.एच. ४२ टी. ६६०० चालवत कुर्डूवाडीकडे जात होते. रात्री २०.१५ वा.सु. मौजे आवरपिंप्री गावाजवळ टाटा इंडीगो कार क्र. एम.एच. १२ एफ.पी. १८४ च्या कारचालकाने कार त्यांच्या टॅकरसमोर आडवी लाउन टँकर थांबवला. कारमधील अंदाजे वय ३० ते ३५ वर्षे वयाच्या दोन अनोळखी पुरुषांनी लोखंडी पाईपने टँकरची काच, आरसा, दिवे फोडले. तसेच टँकर चालकाच्या खिशातील ४,५००/-रु. व सागर कुंभार यांची सात ग्रॅम सोन्याची अंगठी किं.अं. २१,०००/-रु. असा एकुण २५,५००/-रु. चा माल जबरीने चोरुन नेला आहे. अशा मजकुराच्या शिवाजी सुभाष खोमणे यांच्या फिर्यादीवरुन वरील आरोपींविरुध्द पोलीस ठाणे, परंडा येथे भा.दं.वि. कलम ३९२, ३४ प्रमाणे गुन्हा दि. २०.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

**"मौजे दाऊतपूर: शासकिय रकमेचा अपहार."**

**<u>पोलीस ठाणे, ढोकी:</u>** १) मालन दिलीप सोलनकर, तत्कालीन सरपंच-दाऊतपूर २) दिप्ती दिवाकर कुलकर्णी ३) गणेश नामदेव देशमुख, दोन्ही तत्कालीन ग्रामसेवक, ग्रा.पं.कार्यालय, दाऊतपूर ४) कुंडलिक कैलास गायकवाड, शाखा अभियंता, जि.प. बांधकाम उपविभाग, उस्मानाबाद यांनी दि. ०१.०१.२०१९ ते दि. ३१.१२.२०१३ दरम्यान आपापसात संगणमत करुन स्वत:च्या आर्थीक फायद्यासाठी शासकीय रकमेचा गैरवापर केला. शासकीय विकास कामे निकृष्ट दर्जाची करुन शासनाची ९,१६,०००/-रु. ची फसवणुक केली. अशा मजकुराच्या सुरेश ध्रुव तायडे, प्रभारी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उस्मानाबाद यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वरील आरोपींविरुध्द पोलीस ठाणे, ढोकी येथे भा.दं.वि. कलम ४०९, ४०६, ४२०, ३४ प्रमाणे गुन्हा दि. १९.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

**"मौजे सावरगाव: एस.टी.बस मधुन पडल्याने महिला जखमी."**

**<u>पोलीस ठाणे, तामलवाडी:</u>** लक्ष्मी बाळासाहेब मगर रा.सांगवी (काटी), ता.तुळजापूर यांनी दि. २३.०८.२०१९ रोजी १२.३० लक्ष्मी मगर या सावरगाव येथे एस.टी. बसमधुन उतरत असतांना महिला वाहकाने त्या बसमधुन उतरल्याची खात्री न करताच बेल दिल्याने चालकाने बस पुढे नेली. त्यामुळे लक्ष्मी मगर या बसमधुन खाली उतरत असतांना रोडवर पडुन त्यांच्या डोक्यास गंभीर जखम झाली. त्यावेळी लक्ष्मी मगर व बस चालक-वाहक यांत वाद झाला. यावेळी बस चालक-वाहक हे जखमीस उपचारास न नेता निघुन गेले. अशा मजकुराच्या लक्ष्मी बाळासाहेब मगर यांनी वैद्यकिय उपचारादरम्यान दिलेल्या जबाबावरुन (एम.एल.सी) वरील आरोपींविरुध्द पोलीस ठाणे, तामलवाडी येथे भा.दं.वि. कलम २७९, ३३८, ५०४, ३४ सह मो.वा.का. कलम १३४ (अ)(ब) प्रमाणे गुन्हा दि. १९.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

**"नळदुर्ग: एस.टी.बस चालकास मारहान करुन शासकिय कामात अडथळा."**

**<u>पोलीस ठाणे, नळदुर्ग:</u>** किरण शेषेराव बांगर एस.टी.बस चालक बस डेपो, उस्मानाबाद हे दि. २०.०९.२०१९ रोजी १०.३५ वा.सु. गुलबर्गा-औरंगाबाद बस घेवुन बस स्थानक, नळदुर्ग येथे आले. त्यावेळी १) विशाल सहदेव कांबळे रा. नळदुर्ग २) किरण दत्ता कांबळे ३) विकी रविंद्र कांबळे तिघे रा.नळदुर्ग हे तिघे मोटारसायकलवर आले व त्यांनी मोटारसायकलला कट मारल्याच्या कारणावरुन बस चालक किरण बांगर यांना शिवीगाळ-लाथाबुक्यांनी मारहान करुन जिवे ठार मारण्याची धमकी दिली. अशा रितीने बस चालकाच्या शासकीय कामात अडथळा निर्माण केला. अशा मजकुराच्या बस चालक किरण बांगर यांच्या फिर्यादीवरुन वरील आरोपींविरुध्द पोलीस ठाणे, नळदुर्ग येथे भा.दं.वि. कलम ३५३, ३३२, १८९, ३४ प्रमाणे गुन्हा दि. २०.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

## "उमरगा: ॲपे रीक्षा पलटुन एकाचा मृत्यु."

**<u>पोलीस ठाणे, उमरगा :</u>** चंद्रकांत नागय्या शहापुरे रा. धनरकेवाडी, ता.बसवकल्याण (ह.मु. तुरोरी, ता.उमरगा) याने दि. १६.०९.२०१९ रोजी १७.०० ते १७.३० वा.सु. उमरगा ते लातुर रोडवर, आय.टी.आय कॉलेजजवळ, उमरगा येथे रिक्षा क्र. एम.एच. २५ एन. ८०५ ही निष्काळजीपणे चालवल्याने रीक्षा पलटली. यात रीक्षामधील संतोष मरगु लिंबोळे रा. तुरोरी, ता.उमरगा हे मयत झाले तर गंगुबाई मरगु लिंबोळे या जखमी झाल्या अशा मजकुराच्या मरगु तिम्मा लिंबोळे यांच्या फिर्यादीवरुन वरील आरोपीविरुध्द पोलीस ठाणे, उमरगा येथे भा.दं.वि. कलम २७९, ३०४ (अ), सह मो.वा.का. कलम १८४ प्रमाणे गुन्हा दि. २०.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

## "जुगार अड्डयावर छापा."

**<u>पोलीस ठाणे, तुळजापूर:</u>** १) भारत बाबुराव कदम २) राहुल कमलाकर जटाळ ३) कृष्णाय गोविंदराव गुंड ४) श्याम वसंत व्यवहारे ५) नंदकुमार अशोक जगताप ६) सनि सदाशिव जाधव ७) रमेश रंगनाथ कदम ८) दिपक शिवाजीराव हंगरगेकर सर्व रा. तुळजापूर हे दि. १९.०९.२०१९ रोजी १७.०५ वा.सु. तुळजापूर येथे तिरट जुगार खेळत असतांना जुगाराचे साहित्य, व रोख रक्कम ९,१९०/-रु. च्या मालासह पोलीस ठाणे, तुळजापूर यांच्या पथकास आढळुन आले. यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, तुळजापूर येथे म.जु.का. कलम १२ (अ) प्रमाणे गुन्हा दि. १९.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

## "अवैध मद्य विक्री विरुध्द ४ कारवाया"

**<u>पोलीस ठाणे, कळंब:</u>** दि. २०.०९.२०१९ रोजी १३.३० वा.सु. बालाजी लालासाहेब जाधव रा.मोहा, ता.कळंब हे दारुचा अवैध विक्री व्यवसाय करण्याच्या उद्देशाने मौजे मोहा येथे ५ ली. गावठी दारु किं.अं. ३००/-रु. चा माल स्वत:च्या कब्जात बाळगला असतांना पोलीस ठाणे, कळंब यांच्या पथकास आढळुन आले. यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, कळंब येथे दि. २०.०९.२०१९ रोजी गुन्हा दाखल केला आहे.

**<u>पोलीस ठाणे, कळंब:</u>** दि. २०.०९.२०१९ रोजी १२.३० वा. शालु शंकर शिंदे रा. पारधी पिडी, मोहा, ता.कळंब ह्या दारुचा अवैध विक्री व्यवसाय करण्याच्या उद्देशाने पारधी पिडी, मोहा येथे १० ली. गावठी दारु किं.अं. ६००/-रु. चा माल स्वत:च्या कब्जात बाळगला असतांना पोलीस ठाणे, कळंब यांच्या पथकास आढळुन आल्या. यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, कळंब येथे म.दा.का. कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दि. २०.०९.२०१९ रोजी दाखल केला आहे.

**<u>पोलीस ठाणे, कळंब:</u>** दि. २०.०९.२०१९ रोजी ११.३० वा.सु. शंकर नवनाथ शिंदे हे दारुचा अवैध विक्री व्यवसाय करण्याच्या उद्देशाने पारधी पिडी, मोहा येथे २० ली. गावठी दारु किं.अं. १०५०/-रु. चा माल स्वत:च्या कब्जात बाळगला असतांना पोलीस ठाणे, कळंब यांच्या पथकास आढळुन आले. यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, कळंब येथे म.दा.का. कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दि. २०.०९.२०१९ रोजी दाखल केला आहे.

**<u>पोलीस ठाणे, कळंब:</u>** दि. २०.०९.२०१९ रोजी १०.३५ वा.सु. बालु बन्सी काळे रा. बोर्डा फाटा, ता.कळंब हे दारुचा अवैध विक्री व्यवसाय करण्याच्या उद्देशाने मौजे बोर्डा फाटा मोहा येथे १८ ली. गावठी दारु किं.अं. १,०००/-रु. चा माल स्वत:च्या कब्जात बाळगला असतांना पोलीस ठाणे, कळंब यांच्या पथकास आढळुन

आले. यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, कळंब येथे म.दा.का. कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दि. २०.०९.२०१९ रोजी दाखल केला आहे.

**“मोटार वाहन कायदा-नियमांचे उल्लंघन: ११५ कारवाया.”**

**उस्मानाबाद जिल्हा:** दि. १९/०९/२०१९ रोजी उस्मानाबाद जिल्हयातील १८ पोलीस ठाणी व जिल्हा वाहतुक शाखा उस्मानाबाद यांनी वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांविरुध्द मोटार वाहन कायद्याच्या विविध कलम-नियमांनुसार ११५ कारवाया केल्या असुन त्यातुन ३३,८०० ₹ **‘तडजोड शुल्क’** वसुल करण्यात आले आहे.

---

**स्वाक्षरीत**

(विनोद ज.चौधरी)

सहा.पोलीस निरीक्षक

जनसंपर्क विभाग,उस्मानाबाद